# मिरा भाईंदर महानगरपालिका

## उदयान विभाग

**प्रशासकीय ठराव दि. ०९/०६/२०२५ रोजी**

**प्रकरण क्र. :-९०९ मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील उद्यान विभागा अंतर्गत प्रभाग समिती क्र. १,२,३ व ४,५,६ अंतर्गत विविध उद्याने, मैदाने चौपाट्या व दुभाजक इत्यादी ठिकाणी भाडेतत्वावर टँकर वाहन चालकासह, इंधनासह संपुर्ण सेवा ०२ वर्ष भाड्याने घेणेबाबत. (E-५९८४२४)**
**Tender ID.: २०२५_MBMC_११४७६२२_१ (अंदाजित रक्कम रु. २,२५,००,०००/-)**

मिरा - भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय भाईंदर (प)

### कार्यालयीन प्रस्तावना

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील उद्यान विभागा अंतर्गत प्रभाग समिती क्र. १,२,३ व ४,५,६ अंतर्गत विविध उद्याने, मैदाने चौपाट्या व दुभाजक इत्यादी ठिकाणी भाडेतत्वावर टँकर वाहन चालकासह, इंधनासह संपुर्ण सेवा ०२ वर्ष भाड्याने घेणेकामी खालील प्रमाणे निविदा मागविण्यात आलेल्या आहेत.

| Tender ID. : २०२४_MBMC_११०८९२९_१ | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | तपशिल | कालावधी | शेरा |
| १. | जाहिर निविदा सुचना (दै. मुंबई चौफेर, दै.ग्लोबल टाईम्स व दै. महाराष्ट्र सम्राट) | दि.०९/१०/२०२४ ते दि.१६/१०/२०२४ | एक ही निविदा प्राप्त झालेली नाही. |

उपरोक्त कालावधी मध्ये एक ही निविदा प्राप्त न झाल्याने फेर निविदा करण्यात आलेली आहे.

| Tender ID. : २०२४_MBMC_११११६६४६_१ | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | तपशिल | कालावधी | शेरा |
| १. | जाहिर फेर निविदा सुचना | दि.०२/१२/२०२४ ते दि.१६/१२/२०२४ | एक निविदा प्राप्त |

उपरोक्त प्रमाणे एक निविदा प्राप्त झाल्याने स्पर्धात्मक दर मिळण्याकरीता खालील प्रमाणे द्वितीय फेर निविदा मागविण्यात आलेली आहे.

| Tender ID. : २०२४_MBMC_११३०१६५_१ | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | तपशिल | कालावधी | शेरा |
| १. | जाहिर द्वितीय फेर निविदा सुचना (दै.खबरे आजतक, दै.हिंदुस्थान, दै. महाराष्ट्र जनमुद्रा) | दि.२६/१२/२०२४ ते दि.१३/०१/२०२५ | दोन निविदा प्राप्त |

उपरोक्त प्राप्त दोन निविदाधारकांची Technical Bid उघडुन कागदपत्रांची तपासणी केली असता एकच निविदा धारक पात्र ठरत असल्याने खालील प्रमाणे फेर निविदा करण्यात आलेली आहे.

| Tender ID. : २०२५_MBMC_११४७६२२_१ | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | तपशिल | कालावधी | शेरा |
| १. | जाहिर द्वितीय फेर निविदा सुचना (दै.प्रहार, दै.मुंबईलक्षदिप, दै. महाराष्ट्र सम्राट) | दि.१०/०२/२०२५ ते दि.२४/०२/२०२५ | दोन निविदा प्राप्त |

उपरोक्त प्राप्त दोन निविदाधारकांच्या Technical Bid उघडली असता पात्र ०१ निविदाधारक मे.कनिष्क वॉटर सप्लायर्स यांची Financial Bid उघडनेकामी दि.०८/०५/२०२५ रोजी मा. निविदा समिती ने शिफारस करुन दि. १४/०५/२०२५ रोजी मा.आयुक्त सो. यांनी मान्यता दिलेली आहे. त्यानुसार पात्र ०१ निविदाधारक मे.कनिष्क वॉटर सप्लायर्स यांची Financial Bid दि.१६/०५/२०२५ रोजी उघडली असता त्यांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

साक्षांकित प्रत

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

Scanned with CamScanner

Scanned with OKEN Scanner

| अ.क्र. | तपशिल | दर (सर्व करांसह) | |
|---|---|---|---|
| | | मे.कनिष्क वॉटर सप्लायर्स यांनी निविदेत सादर केलेले दर | मे.कनिष्क वॉटर सप्लायर्स यांचे वाटाघाटी अंतीचे दर |
| १ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील उद्यान विभागा अंतर्गत प्रभाग समिती क्र. १,२,३ व ४,५,६ अंतर्गत विविध उद्याने, मैदाने चौपाट्या व दुभाजक इत्यादी ठिकाणी भाडेतत्वावर टँकर वाहन चालकासह, इंधनासह संपुर्ण सेवा ०२ वर्ष भाड्याने पुरवठा करणे. (कालावधी-२ वर्ष) (८००० ते १०००० लिटर क्षमतेचा) | रु. ७९९/- प्रती टँकर प्रती फेरा | रु.७७०/- प्रती टँकर प्रती फेरा |

वरील नमुद केलेल्या कामा करीता मे. कनिष्क वॉटर सप्लायर्स यांनी निविदेत भरलेले दर वाजवी असून वाटाघाटीअंती मे.कनिष्क वॉटर सप्लायर्स (L१) यांची निविदा स्विकारणेकामी दि.२७/०५/२०२५ रोजी मा.निविदा समितीने शिफारस केलेली असुन मा.प्रशासक यांच्या मान्यते करीता गोषवारा सादर करण्यास मा.आयुक्त सो. यांनी दि.०५/०६/२०२५ रोजी मंजुरी दिलेली आहे. सदरकामी अंदाजे रु.२,२५,००,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

सबब, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील उद्यान विभागा अंतर्गत प्रभाग समिती क्र. १,२,३ व ४,५,६ अंतर्गत विविध उद्याने, मैदाने चौपाट्या व दुभाजक इत्यादी ठिकाणी भाडेतत्वावर टँकर वाहन चालकासह, इंधनासह संपुर्ण सेवा ०२ वर्ष भाड्याने घेणेकामी मे.कनिष्क वॉटर सप्लायर्स यांची कमी दराची निविदा मंजुर करुन त्यांचा सोबत करारनामा करुन कार्यादेश देण्यास मा.प्रशासक यांची मान्यता देण्याचा प्रस्ताव प्रशासनाने सादर केलेला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र.७०९ दि. ०९/०६/२०२५**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील उद्यान विभागा अंतर्गत प्रभाग समिती क्र. १,२,३ व ४,५,६ अंतर्गत विविध उद्याने, मैदाने चौपाट्या व दुभाजक इत्यादी ठिकाणी भाडेतत्वावर टँकर वाहन चालकासह, इंधनासह संपुर्ण सेवा ०२ वर्ष भाड्याने घेणेकामी मे.कनिष्क वॉटर सप्लायर्स यांची निविदा मंजुर करुन त्यांचा सोबत करारनामा करुन कार्यादेश देण्यास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत कामाच्या प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी व विशेषत: कलम ४५२ (अ) च्या (१अ) व (१ब) नुसार, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक :- एमसीओ २०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक २६ ऑगस्ट २०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी, राधाबिनोद अरीबम शर्मा, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका मा. महानगरपालिका महासभेच्या अधिकाराचा वापर करुन प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावानुसार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील उद्यान विभागा अंतर्गत प्रभाग समिती क्र. १,२,३ व ४,५,६ अंतर्गत विविध उद्याने, मैदाने चौपाट्या व दुभाजक इत्यादी ठिकाणी भाडेतत्वावर टँकर वाहन चालकासह, इंधनासह संपुर्ण सेवा ०२ वर्ष भाड्याने घेणेकामी मे.कनिष्क वॉटर सप्लायर्स यांची रु.७७०/- प्रती टँकर प्रती फेरा निविदा मंजुर करुन त्यांचा सोबत करारनामा करुन कार्यादेश देण्यास त्याकामी येणाऱ्या रु.२,२५,००,०००/- खर्चास प्रशासक यांची मान्यता ठरावाद्वारे देण्यात येत आहे. पारीत ठरावानुसार उद्यान विभागाने नियमानुसार कार्यवाही करावी.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

साक्षांकित प्रत

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(राधाबिनोद अरीबम शर्मा, भाप्रसे)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा - भाईंदर महानगरपालिका
मुख्य कार्यालय
भाईंदर (प)

Scanned with CamScanner
Scanned with OKEN Scanner

# मिरा भाईंदर महानगरपालिका

उद्यान विभाग

२ रा मजला, प्रभाग समिती क्र.४, कै. विलासराव देशमुख भवन,
जांगिड इन्क्लेव्ह, कनकिया, मिरारोड (पुर्व), ता.जि.ठाणे-४०१ १०७. दुरध्वनी क्र.२८१०३४०९


मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय भाईंदर (प.)

**जा.क्र. मनपा/उद्यान/मिरारोड/ 283 /२०२५-२६** **दिनांक : 11 /०६/२०२५**

**प्रति,**
**सिस्टम मॅनेजर,**
**माहिती तंत्रज्ञान विभाग**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**विषय :- सात कलमी कृती कार्यक्रम (१०० दिवसांची प्राधान्याने करावयाची कामे) महाराष्ट्र लाकसेवा हक्क अध्यादेश २०१५ अंतर्गत ऑनलाईन सेवेबाबत.**
**संदर्भ :- जा.क्र. मनपा/माहिती व तंत्रज्ञान/१८३/२०२५-२६ दि.१०/०६/२०२५ रोजीचे पत्र.**

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी सामान्य नागरिकांचे दैनंदिन जीवन सुकर व्हावे (ईज ऑफ लिव्हींग) यासाठी ई-प्रणाली द्वारे सात कलमी कृती कार्यक्रमा अंतर्गत येत्या १०० दिवसांत प्रशासनाने प्राधान्याने करावयाची कामे निश्चित करून दिलेली आहेत. RTS सेवा नागरिकांना एका क्लिक वर उपलब्ध करणेबाबत निर्देश दिलेले आहेत.

त्या अनुषंगाने उद्यान विभागा संबंधीत महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) वृक्ष संरक्षण आणि संवर्धन अधिनियम, १९७५ मधील कलम ८ मधील तरतुदीनुसार वृक्षतोड परवानगी देणे बाबत झालेल्या ठरावानुसार परवानगीचे नमुने, पावतीचे नमुने व ठराव सोबत जोडुन देण्यात येत आहे.

**(नागेश विरकर)**
**उप मुख्य उद्यान अधिक्षक**
**प्रभाग समिती क्र. ४, ५ व ६**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

D: 2025-26 \ LETTER\LETTER HEAD

Scanned with CamScanner

Scanned with OKEN Scanner

# मिरा भाईंदर महानगरपालिका

उद्यान विभाग
दुसरा मजला, प्रभाग समिती क्र.4, कै. विलासराव देशमुख भवन,
जांगिड इन्क्लेव्ह, कनकिया, मिरारोड (पुर्व), ता.जि.ठाणे-४०१ १०७. दुरध्वनी क्र. २८१०३४०९

जा.क्र. मनपा/उदयान/मिरारोड/११०७/२०२४-२५
प्रति
दिनांक : १८/०२/२०२५

मे.कनकिया पेरिविंकल कन्ट्रंक्शन प्रा.लि.
विल्को सेंटर,सुभाष रोड,
विलेपार्ले (पु.)

विषय :- विकास कामातील बाधित झाडे काढणेकामी व पुर्न:रोपण करणेकामी.
संदर्भ :- १) मे. कनकिया पेरिविंकल कन्ट्रंक्शन प्रा.लि. यांचे दि.०९/०१/२०२५ रोजीचे पत्र
२) दि. २३/०१/२०२५ रोजी सूरजप्रकाश या वृत्तपत्रात व मिरा भाईदर महानगरपालिका संकेतस्थळावर प्रसिध्दी जाहिर नोटीस सुचना. .
३) मा.आयुक्त सो.यांची दि.१०/०२/२०२५ रोजीची मान्यता. (E-Office No. ११७८७८१)
४) दि.१४/०२/२०२५ रोजीची पुस्तक क्र. ३१ व पावती क्र.३०८८ व पुस्तक क्र. ३५४४ पावती क्र. ०३५४३६०

मिरा भाईदर महानगरपालिका मौजे-नवघर येथील स.क्र. २३७ (जुना) १८६ (नविन) हिस्सा क्र. २, ४, ११, १२, १३ स.क्र. २४१ (जुना) ३४ (नविन) हिस्सा क्र.१,२,३ अे,३ बी, ३ सी ५,९ स.क्र.२४२ (जुना ) ३३ (नविन) हिस्सा क्र. १४ या जागेत नविन इमारत बांधकाम सुरु असून इमारतीच्या दोन्ही गेटच्या मधोमध मनपा रोड वरील असल्याने वाहन जाण्यास अडथळा निर्मण होत आहे. या कारणास्तव ०१ नग बॉटलपाम मुळासहित काढणे व ०१ नग पिंपळ पुर्न:रोपण करणेकामी संदर्भ क्र. ०१ अन्वये पत्र प्राप्त झालेले असून महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ सुधारीत २०१६ मधील प्रकरण ५ कलम ८(६) नुसार खालील झाडे मुळासहित काढणेकामी व पुर्न:रोपण करणेकामी अटीशर्तीच्या अधिन राहून परवानगी देण्यात येत आहे.

| अ.क्र | वृक्षाचे नाव | अंदाजे उंची | संख्या | अदांजे वय | मुळासहित काढणे/ पुर्न:रोपण करणे | तपशील |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | बॉटलपाम | २० ते २५ फुट | ०१ | १२ वर्ष | मुळासहित काढणे | सदरची झाडे मिरा भाईदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मौजे-नवघर येथील स.क्र. २३७ (जुना) १८६ (नविन) हिस्सा क्र. २, ४, ११, १२, १३ स.क्र. २४१ (जुना) ३४ (नविन) हिस्सा क्र.१,२,३ अे,३ बी, ३ सी ५,९ स.क्र.२४२ (जुना ) ३३ (नविन) हिस्सा क्र. १४ या जागेत नविन इमारत बांधकाम सुरु असून इमारतीच्या दोन्ही गेटच्या मधोमध मनपा रोड वरील असल्याने वाहन जाण्यास अडथळा निर्मण होत आहे. या कारणास्तव ०१ नग बॉटलपाम मुळासहित काढणे व ०१ नग पिंपळ पुर्न:रोपण करणे आवश्यक आहे. |
| २ | पिंपळ | २० ते २५ फुट | ०१ | १२ वर्ष | पुर्न:रोपण करणे | |
| | | एकूण | ०२ | | | |

Scanned with CamScanner

Scanned with OKEN Scanner

**अटीशर्ती :**

१) सदर ०१ नग झाड काढणेकामी व ०१ नग झाड पुर्न:रोपण करण्याच्या बदल्यात झाडाच्या अंदाजीत वयानुसार २४ नग झा... वृक्षरोपण करणे आवश्यक आहे. त्यानुसार अर्जदार यांनी २४ नग झाडांची नव्याने लागवड करुन सदर झाडांचे Geo T... केलेले आहे.

२) सदरची झाड काढणे /पुर्न:रोपण स्वखर्चाने व स्वनिर्णयाने मनुष्यबळ उपलब्ध करुन तोडणेकामी महानगरपालिका ... प्रकारची साधन सामग्री पुरवणार नाही.झाडाच्या फांद्या,लाकडे रस्त्यावर फेकण्यात येऊ नये.

३) सदर झाडे काढणेकामी/ पुर्न:रोपण करणेकामी परवानगी २५ दिवस वैध आहे. त्यानंतर ही परवानगी आपोआपच रद्द होईल.

४) झाडे काढणेकामी/ पुर्न:रोपण करणेकामी काही अपघात झाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी आपली राहिल.(उदा.वि... वित्तहानी वाहनाचे अपघात)

५) जागेसंबधी काही वाद उद्भवल्यास व प्रकरण न्यायप्रविष्ट झाल्यास ते सोडवण्याची जबाबदारी आपली राहील.महानगर... कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप करणार नाही.

६) झाडे काढणेकामी/ पुर्न:रोपण करणेकामी कोणत्याही नागरींकानी परवानगीची विचारणा केल्यास सदर परवानगीची माहि... बंधनकारक आहे.

७) सदर झाड काढणेकामी व पुर्न:रोपण करण्याच्या बदल्यात अर्जदार यांनी नविन झाडे लावून झाडांचे (Geo Tag) फोटो ... केलेले आहे.त्यानुसार सदर नविन लावलेल्या झाडांची वेळोवेळी निगा व देखभाल न केल्याचे विभागाच्या निर्देशनास आ... आपणांवर महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण आणि संवर्धन नियम २००९ नुसार कायदेशीर फौजदारी स्वरुपाची का... करण्यात येईल.याची नोंद घ्यावी.

८) वृक्ष प्राधिकरणाने अथवा प्राधिकृत वृक्ष अधिकाऱ्याने वर नमुद केलेल्या अटी-शर्तीचे पालन न करणे अथवा परवानगीशिवाय झाड तोडणे हे कृत्य अधिनियमातील कलम २१(१) व (२) अन्वये अपराध आहे, याची नोंद घेणे.

मा. आयुक्त सो. यांच्या मान्यतेने.

(कल्पना गायकवाड)
सहाय्यक आयुक्त (उद्यान)
मिरा भाईंदर महानगरपालिका

Scanned with CamScanner
Scanned with OKEN Scanner

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## उद्यान विभाग

प्रभाग समिती क्र. ४, स्व. विलासराव देशमुख भवन, कनकिया,मिरारोड (पूर्व), ता.जि. ठाणे — ४०११०७.दुरध्वनी क्र. २८१०३४०९

जा.क्र.मनपा/उदयान /मिरारोड /1026 /२०२४-२५

दिनांक :- 13/11/2024

प्रति,
चेअरमन/सेक्रेटरी
डेफोडील को.ऑ.हौ.सो.लि.
क्विन पार्क,मिरा भाईदर रोड
मिरारोड (पु.)

विषय: :- धोकादायक झाड मुळासहित काढणेकामी.

संदर्भ :- १) आपले. दि.१०/६/२०२४रोजीचे पत्र.
२) दि. ०१/०७/२०२४ रोजी लक्ष्यधारी समाचार वृत्तपत्रात प्रसिद्धी.
३) मा.आयुक्त सो.यांची दि. ०७/११/२०२४ रोजीची मंजूरी
(E office No-:५९९२६६ )

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये डेफोडील को.ऑ.हौ.सो.लि. क्विन पार्क,मिरा भाईदर रोड मिरारोड (पु.) येथिल असून झाडाचे खोड किड लागून खराब स्थितीत दिसत आहे. तसेच झाडाच्या वरच्या बाजूस किड लागुन झाड कुजत आहे. झाडाचे मुळ जमिनीच्या वरच्या भागात आले आहे व झाड हे एका बाजूस झुकलेले आहे. सोसायटीच्या बाजुला शाळा असल्याने जोराच्या वाऱ्याने झाड पडून जिवित व वित्तहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यामुळे सदरील झाड काढणेकामी आपणास महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) वृक्ष संरक्षण आणि संवर्धन नियम २००९, सहशासन आदेश, अधिसुचना चे कलम प्रकरण पाच ८ (६) अन्वये नव्याने ०८ नग झाडे लावली असून <u>०१ नग नारळ</u> झाड मुळासहित काढण्यास आपणांस खालील अटीशर्तीच्या अधिन राहून परवानगी देण्यात येत आहे.

**<u>अटी-शर्ती</u>**

त्या कामी पाहणी फी प्रती झाड रु.३००/- याप्रमाणे रु.३००/- कार्यालयात भरुन घेतल्यावर सदर झाड मुळासहित काढयात यावे.

१. सदर झाड काढण्याची परवानगी १५ दिवस वैध आहे. त्यानंतर ही परवानगी आपोआपच रद्द होईल.
२. सदर ०१ नग झाड काढण्याच्या बदल्यात नव्याने लावण्यात आलेल्या झाडाच्या अंदाजीत वयानुसार भरपाई ०८ नग झाडांचे जतन व देखभाल योग्यरित्या करण्यात यावी.अन्यथा आपणांवर महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण आणि संवर्धन नियम २००९ नुसार कायदेशीर दंडात्मक कारवाई करण्यात येईल.
३. सदर झाड काढण्याच्या बदल्यात नविन झाडे न लावल्यास आपणांवर महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण आणि संवर्धन नियम २००९ नुसार कायदेशीर दंडात्मक कारवाई करण्यात येईल.
४. झाडांच्या तोडण्यात आलेल्या फांदया तथा पाला पाचोळा रस्त्यालगत अथवा जवळील कचरा पेटीवर टाकणे अवैध आहे. तसे निदर्शनास आल्यास आपणा विरुध्द कायदेशीर दंडात्मक कारवाई करण्यात येईल.
५. धोकादायक झाडे काढत असताना जिवित व वित्त हानी झाल्यास त्याची जबाबदारी सर्वस्वी आपली राहील.
६. धोकादायक झाडे स्व:खर्चाने व स्व:निर्णयाने मनुष्यबळ उपलब्ध करुन तोडून घेणे.
७. धोकादायक झाडे तोडताना अथवा तोडल्यानंतर कोणत्याही नागरिकांनी पूर्व परवानगीची विचारणा केल्यास सदर पत्राची माहिती देणे आवश्यक आहे.
८. वृक्ष प्राधिकरणाने अथवा प्राधिकृत वृक्ष अधिकाऱ्याने वर नमुद केलेल्या अटी-शर्तीचे पालन न करणे अथवा पूर्व परवानगीशिवाय झाड तोडणे हे कृत्य अधिनियमातील कलम २१(१) व (२) अन्वये अपराध आहे, याची नोंद घेणे.

मा. आयुक्त सो. यांच्या मान्यतेने.

13/11/24

(कांचन गायकवाड)
सहाय्यक आयुक्त तथा
वृक्ष अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका

Received on dt 22/11/24 @ 11:56 AM

पा.पु. 31
पा.क्र. 3041.
22/11/2024.

Scanned with CamScanner
Scanned with OKEN Scanner

मिरा भाईंदर महानगरपालिका
उद्यान विभाग
दुसरा मजला, प्रभाग समिती क्र.४, कै. विलासराव देशमुख भवन,
जांगिड इन्क्लेव्ह, कनकिया, मिरारोड (पुर्व), ता.जि.ठाणे-४०१ १०७. दुरध्वनी क्र. २८१०३४०९

जा.क्र. मनपा/उदयान/मिरारोड/२९२ /२०२५-२६ दिनांक : ०२/०६/२०२५

प्रति,
चेअरमेन/सेक्रेटरी
अंकुर गंगा को.ऑ.हो.सो.लि.
सर्वे नं ५२३/५, गंगा कॉम्प्लेक्स,
नयानगर, मिरा रोड (पु.)

मिरा - भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय भाईंदर (प.)

विषय -: धोकादायक फांद्यांची छाटणी करणेकामी.
संदर्भ -: आपले दि. २९/०५/२०२५ रोजीचे पत्र.

संदर्भीकित प्राप्त अर्जानुसार कार्यालयिन पहाणी केली असता जागेच्या आवारातील खालिल प्रमाणे वृक्षाच्या फ़ांद्या अर्जात नमुद केल्याप्रमाणे तेथिल रहिवाश्यांना वावरण्यासाठी धोकादायक असल्याचे दिसुन आले.

| अ.क्र. | वृक्षाचे नाव | अंदाजे उंची | संख्या | तपशील |
|---|---|---|---|---|
| १ | अशोक | २० ते २५ फुट | ०३ | मिरा रोड (पु) सर्वे.नं५२३/५ गंगा कॉम्प्लेक्स, नयानगर, अंकुर गंगा को.ऑ.हो.सो.लि. येथे ०४ नग झाडे आहे. सदर झाडांच्या फांद्या/झावळ्यां धोकादायक रित्या वाढलेल्या आहेत. जोऱ्याच्या वाऱ्याने फांद्या पडून जिवित व वित्तहाणी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. झाडांच्या फांद्या/झावळयांची छाटणी करुन भार कमी करणे आवश्यक आहे. या करणास्तव सदर झाडाच्या फांद्याची छाटणी करणे आवश्यक आहे. |
| २ | आंबा | २५ ते ३० फुट | ०१ | |
| | | एकुण | ०४ | |

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन करणे अधिनियम १९७५ चे कलम ८(३)(क) अन्वये वर नमुद केल्याप्रमाणे वृक्षांच्या फ़क्त त्रासदायक /धोकादायक फ़ांद्या छाटण्यास आपणांस खालिल अटी व शर्तीस अधिन राहुन सदर परवानगी पत्र देण्यात येत आहे.

१) **त्रासदायक/ धोकादायक झाडाच्या फांदयाची/झावळयांची छाटणी करणेकामी पहाणी फ़ी प्रती झाड रु.३००/- याप्रमाणे ०४ नग झाडाचे रु.१,२००/- कार्यालयात भरणा करुन घेतल्यानंतर सदर झाडाच्या त्रासदायक फांद्यांची छाटणी करुन घेण्यात यावी.**
२) या अधिनियमात सुचित केल्यानुसार झांडाचे जतन करणे हे मालक अथवा भोगवटादाराचे कर्तव्य असल्याने झाडाच्या मुख्य फ़ांदी/खोडास इजा अथवा तोड न करता वरिल नमुद संख्या व आकारापेक्षा जास्त फ़ांद्याची छाटणी करता येणार नाही.
३) झांडाच्या फ़ांद्या छाटणेसाठी सदरची परवानगी १५ दिवस वैध असूनत्यानंतर ही परवानगी आपोआपच व्यपगत होईल.
४) झांडाचा पर्णभार सर्व बाजुंनी संतुलित राहिल याची दक्षता घेण्यात यावी.
५) झाड संपुर्ण पर्णहिन होणार नाही याची दक्षता घेणे बंधनकारक असून त्या बाबत तसे निदर्शनास आल्यास आपणा विरुद्ध कायदे शिर कारवाई करण्यात येईल.
६) इमारतीस /जीवितास फ़क्त त्रासदायक/धोकादायक ठरणा-या फ़ांद्याच तोडता येणार आहे.
७) नारळ अथवा ताड या झांडाचे बाबतीत सुकलेल्या/वाकलेल्या झावळ्या तथा फ़ळे तोडताना त्याच्या नवजात पानांस इजा होणार नाहो याची जबाबदारी आपली राहिल.
८) झाडांच्या फांदयाची छाटणी करत असताना कोणतीही जिवित व वित्त हानी झाल्यास त्याची जबाबदारी सर्वस्वी आपली राहील.
९) झांडाच्या फ़ांद्या स्वःखर्चाने व स्वःनिर्णयाने मनुष्यबळ उपलब्ध करुन तोडुन घेणे बंधनकारक राहील.
१०) झांडाच्या तोडण्यात आलेल्या धोकादायक फ़ांद्या तथा पाला पाचोळा घोडबंदर येथिल परिवहन डेपोच्या बाजूला असलेल्या महानगरपालिकेच्या आरक्षित जागेत टाकण्यात यावा.तसेच रस्त्यालगत अथवा जवळील कचरा पेटीवरटाकणे अवैध आहे. तसे निदर्शनास आल्यास आपल्या विरुद्धकायदेशिर दंडात्मककारवाई करण्यात येईल.
११) झाडाच्या फ़ांद्या तोडताना अथवा तोडल्यानंतर कोणत्याही नागरिकाने पुर्व परवानगी बाबत विचारणा केल्यास सदर पत्राची माहिती देणे बंधनकारक राहील.
१२) आपणवर नमुद केलेल्या अटी व शर्तीचे पालन न केल्यास तसेच वृक्ष प्राधिकरण विभागअथवा प्राधिकृत वृक्ष अधिकारी यांच्या पुर्व परवानगी शिवाय झाड/झाडाच्या फ़ांद्या छाटणी/तोडल्याचे कृत्यकेल्यास अधिनियमातील कलम २१(१) व (२) अन्वये कारवाई करण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी.

पु.क्र - 33
पा.क्र - 3280
दि - 03/06/2025

(नागेश विरकर)
वृक्ष अधिकारी
प्रभाग समिती क्र. ४,५ व ६
मिरा भाईंदर महानगरपालिका

Scanned with CamScanner
Scanned with OKEN Scanner

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## उदयान विभाग

**प्रशासकीय ठराव दि. ०९ /०९/२०२४ रोजी**

969

**प्रकरण क्र. :-** **मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील धोकादायक/विकास कामातील वृक्ष काढणे/पुर्न:रोपण करणे/झाडांच्या फांद्या छाटणी करणेकामी दर निश्चिती प्रशासकीय ठराव क्र ३११ दि.२१/०३/२०२३ मध्ये दुरुस्ती करणे.**

### कार्यालयीन प्रस्तावना

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील धोकादायक / विकास कामातील वृक्ष तोडणे व वृक्ष पुर्नरोपण करणेकामी वृक्षारोपण करण्याप्रित्यार्थ अनामत रक्कम घेणे, वृक्षारोपणास जागा उपलब्ध नसल्यास त्याप्रित्यार्थ वृक्ष रोपे व वृक्षारोपांचे जतन करण्या प्रित्यार्थ ना परतावा वृक्ष निधी रक्कम जमा करूण घेणे तसेच पाहणी फ़ी वृक्ष तोडणे, वृक्ष पुर्न:रोपण करणे व वृक्षांची छाटणी करणेकामी प्रशासकीय ठराव क्र ३११ दि. २१/०३/२०२३ अन्वये फ़ी वाढ करण्यात आली आली आहे.

तथापी अँड. रवि व्यास यांचे दि.२९/०७/२०२४ व मा. नगरसेवक श्री.विजय राय यांचे दि.२९/०७/२०२४ अन्वयेच्या पत्रान्वये प्रशासकीय ठराव क्र. ३११ दि.२१/०३/२०२३ च्या ठरावात वृक्षांची छाटणी करणे, वृक्षांची छाटणी (फांद्या) उचलणे, वृक्षांची छाटणी व फांद्या उचलणे व वृक्ष पुनरोपण करणे कामाकरिता अन्यायकारक शुल्क आकारण्यात आलेले असल्याने सोसायटीच्या आम्हाला तक्रारी प्राप्त होत आहेत त्यामुळे प्रशासकीय ठराव क्र ३११ दि.२१/०३/२०२३ च्या ठरावाबाबत फेरविचार करावा किंवा रद्द करावा याबाबत पत्रान्वये कळविले आहे.

त्यानुसार प्रशासकीय ठराव क्र ३११ दि. २१/०३/२०२३ च्या ठरावात खालील प्रमाणे दुरुस्ती करुन सुधारणा करण्यात येत आहे.

**अ. सोसायटी / घरांच्या परिसरातील झाडे तोडणे / पुर्नरोपण / छाटणी करणे.**

| अ.क्र | तपशिल | करावयाची कारवाई |
|---|---|---|
| १. | वृक्ष तोडणे | १) १ झाड तोडण्याच्या बदल्यात अंदाजित केलेल्या वया प्रमाणे भारतीय प्रजातीची ६ फुट उंचीच्या रोपांची लागवड करण्यात यावी.<br>२) मात्र वृक्षरोपणासाठी जागा नसेल तर वृक्ष प्राधिकरणाकडे वृक्ष रोपे लावणे व वृक्षरोपांचे जतन करण्या प्रित्यर्थ नापरतावा वृक्षनिधी रक्कम **रु.१,५००/-प्रति वृक्ष प्रमाणे** जमा करुन घेणे. |
| २. | वृक्ष पुनःरोपण | १) १ झाड **पुर्न:रोपण करण्याच्या बदल्यात ०१ नग** भारतीय प्रजातीचे ६ फुट उंचीच्या रोपांची लागवड करण्यात यावी.<br>२) नव्याने १ वृक्ष पुर्न:रोपण करण्याप्रित्यार्थ रु.५,०००/- प्रति वृक्ष प्रमाणे सुरक्षा अनामत रक्कम जमा करणे. पुर्नरोपणाच्या दिनांकापासून तीन वर्षापर्यंत नित्यनियमाने दर सहा महिन्यानी वृक्ष स्थिती (Tree Status) अहवाल महानगरपालिकेस सादर करणे. तदनंतर वृक्ष सुस्थितीत असल्याची खातरजमा केल्यानंतर सुरक्षा अनामत रक्कम परत करण्यात येईल.<br>३) १ वृक्ष पुर्न:रोपण करण्यासाठी सोयायटी / अर्जदाराकडे पुर्न:रोपण करण्यासाठी जागा उपलब्ध नसल्यास व महानगरपालिका जागा उपलब्ध करुन देत असल्यास रु.५,०००/- सुरक्षा अनामत ऐवजी रु.५,०००/- प्रति वृक्ष प्रमाणे वृक्षनिधी जमा करणे व महानगरपालिकेकडुन झाड पुर्न:रोपण करण्यात येईल. |
| ३. | वृक्षाची छाटणी करणे. | खाजगी जागेतील **वृक्षाची छाटणी करणे व छाटणी उचलुन मनपा वाहनाद्वारे घोडबंदर प्रकल्प येथे टाकणेकामी प्रती वृक्ष प्रमाणे रु.१,०००/- वृक्ष निधी** जमा करुन घेणे. |
| ४. | वृक्षांची छाटणी (फांद्या) उचलणे. | खाजगी जागेतील करण्यात आलेली छाटणी उचलणेकामी प्रती वृक्ष याप्रमाणे रु. ५००/- जमा करुन घेणे. |
| ५. | **धोकादायक झाडे मुळासहित काढणे.** | महानगरपालिकेची झाडे काढणेकामी परवानगी सोसायटीधारकांनी प्राप्त करुन घेतल्यानंतर मनपा कर्मचारी यांच्या मार्फत धोकादायक झाडे मुळासहित काढणेकामी नागरीक / को.ऑ.हौ.सो.लि. सोसायटी यांची विनंती असेल तर प्रती वृक्ष खालील प्रमाणे जमा करुन घेणे. |

| अ.क्र. | झाडांचा तपशिल | परीमाण | दर |
|---|---|---|---|
| १ | उंची (Height) - २० फुटापर्यंत<br>बुंध्याची जाडी (Girth) - १ फुटापर्यंत | प्रती झाड | रु.२,४००/- |
| २ | उंची (Height) - २० ते ३५ फुटापर्यंत<br>बुंध्याची जाडी (Girth) - १ ते २.५० फुट | प्रती झाड | रु.५,४००/- |
| ३ | उंची (Height) - ३५ ते ५० फुट किंवा त्यापेक्षा जास्त<br>बुंध्याची जाडी (Girth) - २.५० फुटापेक्षा जास्त | प्रती झाड | रु.११,२००/- |

Scanned with CamScanner

Scanned with OKEN Scanner

ब. विकासकामातील झाडे तोडणे/ पुर्नरोपण करणे.

| अ.क्र. | तपशिल | करावयाची कारवाई |
|---|---|---|
| १. | वृक्ष तोडणे | १) १ झाड तोडण्याच्या बदल्यात अंदाजित केलेल्या वया प्रमाणे भारतीय प्रजातीची ६ फुट उंचीच्या रोपांची लागवड करण्यात यावी.<br>२) नव्याने १ वृक्ष रोपण करण्याप्रित्यथे रु.१०,०००/- प्रमाणे सुरक्षा अनामत रक्कम जमा करणे.<br>३) ग्त्र वृक्षरोपणासाठी जागा नसेल तर वृक्ष प्राधिकरणाकडे वृक्ष रोपे लावणे व वृक्षरोपांचे जतन करण्या प्रित्यर्थ नापरतावा वृक्षनिधी रक्कम रु.२५,०००/- प्रति वृक्ष प्रमाण जमा करुन घेणे. |
| २. | वृक्ष पुन:रोपण | १) १ झाड पुर्न:रोपण करण्याच्या बदल्यात ०१ नग भारतीय प्रजातीचे ६ फुट ते ८ फुट उंचीच्या रोपांची लागवड करण्यात यावी.<br>२) नव्याने १ वृक्ष पुर्न:रोपण करण्याप्रित्यार्थ रु.१०,०००/- प्रति वृक्ष प्रमाणे सुरक्षा अनामत रक्कम जमा करणे. पुर्नरोपणाच्या दिनांकापासून तीन वर्षापर्यंत नित्यनियमाने दर सहा महिन्यानी वृक्ष स्थिती (Tree Status) अहवाल महानगरपालिकेस सादर करणे. तदनंतर वृक्ष सुस्थितीत असल्याची खातरजमा केल्यानंतर सुरक्षा अनामत रक्कम परत करण्यात येईल.<br>३) विकास जागेवर नव्याने वृक्षरोपण करण्यास जागा उपलब्ध नसल्याने त्याप्रित्यर्थ रु.२५,०००/- प्रति वृक्ष प्रमाणे वृक्षनिधी जमा करणे. |

क. पाहणी फी

| अ.क्र. | तपशिल | करावयाची कार्यवाही |
|---|---|---|
| १ | वृक्ष तोडणे | वृक्ष तोडणे / वृक्ष पुर्न:रोपण / वृक्ष छाटणी करणेकामी पाहणी फी प्रती झाड रु.३००/- या प्रमाणे जमा करुन घेणे. |
| २ | वृक्ष पुर्न:रोपण | |
| ३ | वृक्ष छाटणी | |

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील धोकादायक / विकास कामातील वृक्ष काढणे / पुर्न:रोपण करणे / झाडांच्या फांद्या छाटणी करणेकामी दर निश्चिती प्रशासकीय ठराव क्र ३११ दि. २१/०३/२०२३ मध्ये उपरोक्त नमुद प्रमाणे दुरुस्ती करणेकामी मा.प्रशासक यांची मान्यता मिळणेकामी नगरसचिव यांच्याकडे गोषवारा सादर करण्यास मा. आयुक्त सो. यांनी दि.०४/०९/२०२४ रोजी मंजुरी दिलेली आहे.

सबब, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील धोकादायक / विकास कामातील वृक्ष काढणे / पुर्न:रोपण करणे / झाडांच्या फांद्या छाटणी करणेकामी दर निश्चिती प्रशासकीय ठराव क्र ३११ दि. २१/०३/२०२३ मध्ये उपरोक्त नमुद प्रमाणे दुरुस्ती करणेकामी मा.प्रशासक यांची मान्यता देण्याचा प्रस्ताव प्रशासनाने सादर केलेला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र. १६१ दि. ०८/०९/२०२४**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील धोकादायक / विकास कामातील वृक्ष काढणे / पुर्न:रोपण करणे / झाडांच्या फांद्या छाटणी करणेकामी दर निश्चिती प्रशासकीय ठराव क्र ३११ दि. २१/०३/२०२३ मध्ये उपरोक्त नमुद प्रमाणे दुरुस्ती करणेकामी प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत कामाच्या प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी व विशेषत: कलम ४५२ (अ) च्या (१अ) व (१ब) नुसार, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक :- एमसीओ २०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक २६ ऑगस्ट २०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी, संजय श्रीपतराव काटकर, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका मा. महानगरपालिका महासभेच्या अधिकाराचा वापर करुन प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावानुसार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रांतील धोकादायक / विकास कामातील वृक्ष काढणे / पुर्न:रोपण करणे / झाडांच्या फांद्या छाटणी करणेकामी दर निश्चिती प्रशासकीय ठराव क्र ३११ दि.२१/०३/२०२३ मध्ये उपरोक्त नमुद प्रमाणे दुरुस्ती करणेकामी प्रशासक यांची मान्यता ठरावाद्वारे देण्यात येत आहे. पारीत ठरावानुसार उद्यान विभागाने नियमानुसार कार्यवाही करावी.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(संजय श्रीपतराव काटकर, भाप्रसे)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

Scanned with CamScanner
Scanned with OKEN Scanner

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, भाईंदर (प.), ता. जि. ठाणे - ४०१ १०१.

उद्यान व वृक्षप्राधिकरण विभाग

(नगरभवन पहिला मजला)

3257

पावती क्र. : .................................. दिनांक : ..................................

श्री. .................................................................................... रा. ..................................

यांचे मालकीचे / सोसायटीची धोकादायक झाडाची स्थिती दाखवून आकारणी करणे.

| | रुपये | पैसे |
|---|---|---|
| १) पाहणी करुन परवानगी देणे<br>२) प्रति झाड - वृक्ष छाटणी<br>३) २५ फुट उंचीपर्यंत व अंदाजे १० वर्षापर्यंत असणारे झाड<br>४) २५ फुट उंचीच्यावर व अंदाजे १० वर्षाच्यावर असणारे झाड | | |
| | | |

अक्षरी रुपये

दिनांक :

लिपीक<br>
वृक्षप्राधिकरण विभाग<br>
मिरा भाईंदर महानगरपालिका

Scanned with CamScanner
Scanned with OKEN Scanner

एक वोट से होती जीत हार, वोट न कोई करे बेकार

M.A.C. Form No. 2

नमुना नं. See Rule 12, 110 (2) 114 116 (2) and 117, (1) (2) & (3)

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

सर्वसाधारण पावती

पु. No.: 3545 पा. No. 0354421

श्री. ______ यांच्याकडून ______ बद्दल

______ रुपये (अक्षरी रु. ______ मिळाले)

दिनांक ______

लिपीकाची सही प्राधिकृत अधिकाऱ्याची सही

______ रोकड वहीत नोंद केली. पृष्ठ क्रमांक ______

लेखापाल / रोखपाल

Scanned with CamScanner

Scanned with OKEN Scanner

# मिरा भाईदर महानगरपालिका
# उद्यान विभाग

## नागरीकांनी झाडे छाटणी/काढणे/पुर्नरोपण करणे बाबत चा नमुना

१) अर्जदाराचे नाव :

२) अर्जदाराचा पत्ता :

३) अर्जदाराचा नंबर :

४) जागेचे लोकेशण :

५) झाडे छाटणी/मुळासहित काढणे/पुर्नरोपण करणे : कारण

६) नविन झाडे लावण्याचे ठिकाण :

Scanned with OKEN Scanner